दाखल तारीख २७/०५/२०१९
नोंदणी तारीख २७/०५/२०१९
निकाल तारीख ०५/०५/२०२६
कालावधी ०६वषे,११म.,०८दि.

**भाग अ**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क.२७** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- योगेश्वर जयसिंग वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क.६५/२०१७<br>चामोर्शी पोलिस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५/०५/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११२/२०१९ |
| | CNR No. MHGA090003192019 |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे चामोर्शी |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. एस. एम. सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | रमेश रामलु कोटगिलवार,<br>वय ४० वर्षे, व्यवसाय- शेती,<br>रा. कढोली, ता. सावाली,<br>जि. चंद्रपुर. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.व्हि.जी.चिळंगे**<br>(बचाव पक्षातर्फे वकील) |

**भाग ब**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २४/०३/२०१७ |
| पहिल्या खबरीची तारीख | २४/०३/२०१७ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २७/०५/२०१९ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | १५/०७/२०१९ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०८/०४/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५/०५/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रमेश रामलु कोटगिलवार, | १०/०४/२०१७ | ११/०४/२०१७ | कलम ६५(ई) म.दा.का. | निर्दोष मुक्त | निर्दोष मुक्त | लागु नाही |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | चंपत गणपत मडावी | पंच |
| सा.क्र. २ | नितीन आबाजी पाल | फिर्यादी |
| सा.क्र. ३ | दिलीप लक्ष्मण सोनुने | तपासी अधिकारी |
| सा.क्र. ४ | राजेश श्रीराम घुटके | साक्षीदार |
| सा.क्र. ५ | रेमाजी श्रावण धुर्वे | सि.ए.कॅरिअर |

**ब. <u>बचाव साक्षीदार, असल्यास</u> :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. <u>न्यायालयीन साक्षीदार, असल्यास</u> :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

## सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी

**अ. सरकारपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-१३**/सा.क्र.१ | घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा |
| २ | निशाणी/**पी-१४**/सा.क्र.१ | मालमत्ता शोध व जप्ती नमुना |
| ३ | निशाणी/**पी-१६**/सा.क्र.२ | फिर्याद |
| ४ | निशाणी/**पी-१७**/सा.क्र.२ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ५ | निशाणी/**पी-२०**/सा.क्र.३ | अटक फार्म |
| ६ | निशाणी/**पी-२२**/सा.क्र.४ | सी.ए. फार्म |
| ७ | निशाणी/**पी-२५**/सा.क्र.५ | पोचपावती |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१० | सि.ए.अहवाल |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | निशानी क्रमाक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(आज दिनांक ०५ मे २०२६ रोजी घोषीत)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे :**

अ) फिर्यादी चालक पोलिस शिपाई नितीन आबाजी पाल यांनी दिनांक २४. ०३.२०१७ रोजी फिर्याद दिली की, दि. २४.०३.२०१७ रोजी ते पोलीस स्टेशनला हजर असतांना मुखबिरद्वारे खबर मिळाली की, मौजा कढोली येथील इसम नामे रमेश कोटगीलवार हा मौजा तळोधी ते काढोली जाणा-या रस्त्यावर अवैधरित्या बिनापरवाना

देशी दारु बाळगुन तिची विक्री करीत आहे. सदर माहितीवरुन ते व ईतर पोलीस कर्मचारी खाजगी वाहनाने मौजा तळोधी ते कढोली जाणा-या नदीघाट रस्त्यावर जाण्याकरीता सिल साहित्यासह रवाना झाले. नदीघाटावर दगडावर एक ईसम बसुन होता त्या ईसमाजवळ जावुन त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रमेश रामलु कोटगिलवार असे सांगितले. त्याच्या नावाची खात्री झाल्याने त्याला त्याच्याकडे येण्याचे कारण सांगुन तो बसुन असलेल्या दगडाचे आजुबाजुचे पाहणी करीत असतांना पोलीसांना व पंचांना पाहुन तो पळुन गेला. पोलीसांना व पंचांना संशय आल्याने तो बसुन असलेल्या दगडाचे फटीमध्ये एक प्लास्टीक चुंगळी दिसली, सदर चुंगळी बाहेर काढुन दोन पंचासमक्ष पाहणी केली असता सदर चुंगळीमध्ये ९० मीली मापाच्या रॉकेट देशी दारू संत्रा कंपनीच्या २० सिलबंद निपा मिळुन आल्या. त्यानंतर जप्त मालामधुन एक ९० मीली मापाची बॉटल रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढल्यानंतर ती पोलीसांच्या व पंचाच्या सहीने सील करण्यात आली. त्यानंतर पोलीस कर्मचारी नमुना बॉटल घेवुन पोलीस स्टेशनला परत आल्यावर फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादवरुन अपराध क्र. ६५/२०१७ नुसार महाराष्ट्र् दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

३. सदर गुन्हयाचा तपास पोलिस हवालदार दिलीप लक्ष्मण सोनुने यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले व नमुना म्हणुन काढण्यात आलेली बॉटल रासायनिक प्रयोगशाळा नागपुर येथे पाठविले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीविरुध्द फौ.प्र.सं.चे कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब नि.क्रं.२६ वर नोंदविण्यात आला. सदर जबाबामध्ये त्याच्याविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव आरोपीने घेतला आहे.

४. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी निशानी क्र. ११ वर आरोपीविरुध्द गुन्हयाचे विवरण निश्चीत केले. ते त्याला त्याच्या मातृभाषेत समजावुन सांगण्यात आल्यानंतर आरोपीने आरोप अमान्य करुन खटल्याला सामोरे जाण्यास तयारी दर्शविली.

५. माझ्या समक्ष विचारासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. मी प्रत्येक मुद्दयाच्या समोर माझे निष्कर्ष नोंदविल्यानंतर त्याबद्दलच्या कारणमिमांसेचे विवेचन केलेले आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २४.०३.२०१७ रोजी रात्री २१.४५ वाजताच्या सुमारास मौजा तळोधी ते कढोली जाणा-या नदी घाट रस्त्यावर, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली येथे आरोपी एक प्लास्टीक चुंगळीमध्ये रॉकेट देशी दारू संत्रा कपंनीच्या ९० मि.ली. मापाच्या एकुण २० सिलबंद निपा अंदाजे किंमत रूपये १२००/- चा माल विनापरवाना अवैध्यरित्या विक्री करण्याच्या उददेशाने मिळुन आला आणि त्याव्दारे आरोपीने महाराष्ट् दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला आहे असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | अंतिम आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पाच साक्षदार तपासले. नि.क्रं.१ वर आदेश पारीत करून सरकारी पक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली.

**मुद्दा क्र.१ व २ बाबत :**

७. पंच साक्षीदार क्रं.१ चंपत गणपत मडावी याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, आरोपीला तो ओळखतो. पोलीसांनी त्याला पंच म्हणुन तळोधी नदीच्या काठावर बोलावले होते. तो पोलीसांसोबत तळोधी नदीच्या काठावर गेला असता त्यांना एक इसम नदीच्या काठावर बसलेला दिसला. तो इसम बसुन असलेल्या दगडाच्या खाली त्यांना ९० मीलीच्या देशी दारुच्या २० बॉटल्या मिळुन आल्या. त्यापैकी एक बॉटल वेगळी काढुन ती त्याच्या व पोलीसांच्या सहीने सील केली. घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला व त्यांने घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली. त्याला दाखविण्यात आलेले घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा नि.क्र.१३ व मालमत्ता शोध व जप्ती नमुना नि.क्र.१४ वर त्याची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्यचे सांगितले. त्यावेळेस त्याच्यासोबत दुसरा पंच नंदु भांडेकर होता व त्याने सुध्दा पंचनाम्यावर सही केली होती.

८. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने सांगितले की, चामोर्शी पासुन तळोधी नदी घाट दहा कि.मी. अंतरावर आहे. त्याने पुढे सांगितले की,

पोलिसांनी त्याला पंच म्हणुन हजर राहण्याकरीता लेखी सुचना दिली होती. त्यांनी मान्य केले की, दारुच्या केसमध्ये तो न्यायालयात अनेकदा साक्ष देण्यासाठी आला आहे व डयुटी सोडुन कोठे जायचे असेल तर वरिष्ठांची परवानगी घ्यावी लागते. त्यानंतर त्याने ईतर सर्व सुचना नाकारल्या आहे.

९. फिर्यादी साक्षदार क्रं.२ यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दि.२४.०३. २०१७ रोजी ते पोलीस स्टेशन चामोर्शी येथे चालक पोलीस शिपाई म्हणुन कार्यरत होते. त्या दिवशी मुखबीरद्वारे माहिती मिळाली आरोपी हा तळोधी ते कडोली नदी घाटावर अवैध्यरित्या दारू बाळगुन विक्री करीत आहे. त्यानुसार ते, पोलीस कर्मचारी व दोन पंच नदी घाटावर गेले असता एक ईसम दगडावर बसुन असताना मिळुन आला. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने स्वत:चे नाव रमेश रामू कोटगीलवार असे सांगितले. त्याला तिथे येण्याचे कारण सांगितल्यानंतर तो तिथुन पळुन गेला. त्यानंतर दगडाच्या आजु बाजुच्या परिसराची पाहणी केली असता एका प्लास्टीक चुंगळीत ९० मीली मापाच्या २० देशी दारूच्या बाटल्या मिळुन आल्या. त्यानंतर पोलीस हवालदार राजेश घूटके यांनी पंचनामा केल्यानंतर ते मूददेमालासह पोलीस स्टेशनला परत आले व त्यांनी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. त्यांना दाखविण्यात आलेले फिर्याद नि. क्रं.१६ व छापील प्रथम खबरी अहवालाची प्रत नि.क्रं.१७ वर त्यांची व डायरी अमलदाराची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले.

१०. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, घुटके साहेब त्यांचे वरिष्ठ आहेत व घटनास्थळावर संपूर्ण कार्यवाही घुटके साहेब यांनी केली. त्यांनी पुढे मान्य केले की, राजेश घुटके तक्रार देवु शकले असते. त्यांनी पुढे मान्य केले की, चंपत मडावी व नंदु भांडेकर पोलीस स्टेशन चामोर्शी येथे विशेष पोलीस अधिकारी म्हणुन काम करतात. त्यांनी पुढे मान्य केले की, पोलीस स्टेशन पासुन तळोधी नदी घाट १५ ते १६ किलोमीटर अंतरावर आहे. त्यानंतर त्यांनी इतर सुचक प्रश्नांना नाकारले आहे.

११. तपासी अधिकारी साक्षीदार क्रं.३ यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दि.२४.०३.२०१७ रोजी ते पोलीस स्टेशन चामोर्शी येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत होते. अपराध क्रमांक ६५/२०१७ चा तपास त्यांना दि.२४.०३.२०१७ रोजी मिळाला. त्यांनी तपासाकामी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जप्त मूददेमाल रासायनिक

विश्लेषणासाठी नागपुर प्रयोगशाळेत पाठविले व त्याबाबत रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाले. त्यांना दाखविण्यात आलेला नि.क्रं.१० वरील रासायनिक विश्लेषण अहवाल तोच असल्याचे सांगितले. त्यांनी आरोपीला अटक करुन अटक फार्म नि.क्रं.२० वर त्यांची, आरोपीची व साक्षीदाराची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. आरोपीकडे देशी दारूच्या २० निपा मिळाल्या असे तपासात निषन्न झाले.

१२. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, साक्षीदार क्रं.१ चंपत मडावी हा चामोर्शी पोलीस स्टेशनला विशेष पोलीस अधिकारी म्हणुन काम करतात. त्यांनी पुढे मान्य केले की, ज्या ठिकाणी घटना घडली तेथील स्थानिक पंच घ्यावे लागतात व कथीत घटना तळोधी गावच्या हदीत घडली. त्यांनी पुढे मान्य केले की, त्या शिवारातील प्रतिष्ठित व्यक्ती पंच म्हणुन घेण्यात आला नाही. त्यांनी मान्य केले की, चामोर्शी पोलीस स्टेशन पासुन कथीत घटनास्थळ सुमारे २० किलोमिटर अंतरावर आहे. त्यांनी पुढे मान्य केले की, नंदु भांडेकर हा देखील चामोर्शी पोलीस स्टेशनला विशेष पोलीस अधिकारी म्हणुन काम करतो. त्यानंतर त्यांनी इतर सर्व सुचना नाकारल्या आहे.

१३. साक्षीदार क्रं.४ यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दि.२४.०३.२०१७ रोजी ते पोलीस स्टेशन चामोर्शी येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत होते. सदर दिवशी २०.०५ वाजता माहिती मिळाली की, मौजा कडोली येथील रमेश कोटगिलवार हा तळोधी ते कडोली या नदीकाट रस्त्यावर देशी दारूची अवैध्य विक्री करत आहे. सदर माहिती वरून दोन पंचांना सोबत घेवुन पोलीस स्टॉफ पोलीस हवालदार दिलीप सोनुने, चालक शिपाई नितीन पाल व होमगार्डचे तिन सैनिक यांच्यासह पोलीस स्टेशनमधुन रवाना होवुन घटनास्थळावर गेले. त्यानंतर एक ईसम नदी घाटावर एक दगडावर बसुन दिसला व त्याच्याजवळ गेले असता त्याला त्याचे नाव विचारले. त्याने त्याचे नाव रमेश रामलु कोटगिलवार असे सांगीतले. त्यानंतर मुखबिरच्या खबरेप्रमाणे नावाची खात्री झाल्याने त्याला त्याच्या जवळ जाण्याचा उद्देश सांगीतला. त्यानंतर मोबाईल टार्चच्या मदतीने तो बसलेल्या ठिकाणी पाहणी केली त्यावेळी आरोपी हा त्यांना पाहुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. त्यानंतर त्यांना पुन्हा संशय आल्याने तो ज्या दगडावर बसला होता त्या दगडाची पाहणी केली असता दगडाच्या फटीमध्ये एक चुंगळी मिळुन आली आणि ती चुंगळी पंचासमक्ष बाहेर काढली. त्यानंतर त्या चुंगळीची पाहणी

केली असता त्यामध्ये प्रत्येकी ९० मीली मापाच्या देशी रॉकेट संत्रा कंपनीच्या बॅच नं. १२८, मार्च-२०१७ असे लेबल लावलेले २० नग निपा मिळुन आल्या. त्यानंतर त्यांनी त्याचा पंचनामा केला. त्यांना दाखविण्यात आलेला नि.क्रं.१३ वरील पंचनामा तोच असल्याचे सांगितले. चंपत मडावी व नंदु भांडेकर दोन्ही राहणार चामोर्शी हे पंच होते. पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर मिळालेल्या मुददेमालातुन एक निप वेगळी काढुन त्यावर पंचांच्या व त्यांच्या सहिचे लेबल लावुन रासायनिक विश्लेषणासाठी सिलबंद केली आणि जप्त मुददेमालाचा प्रोपर्टी फार्म भरला. त्याला दाखविण्यात आलेला नि.क्रं.१४ वरील प्रॉपर्टी फार्म तोच असुन त्यावर त्यांची व पंचांची सही आहे आणि त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस शिपाई नितीन पाल यांनी फिर्याद दिली. त्यानंतर जप्त नमुन्याचा सि.ए. फार्म भरला. सी.ए. फार्म नि.क्रं.२२ वर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर सी.ए. करीता मुददेमाल बखल नंबर १४६५ दुर्वे हे घेवुन गेले होते.

१४. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी सांगितले की, खबर मिळाल्याची नोंद स्टेशन डायरीला केली होती. त्यांनी पुढे सांगितले की, पंचांना नोटीस दिली नव्हती. त्यांनी पुढे सांगितले की, चंपत मडावी व नंदु भांडेकर हे पोलीस स्टेशनला काम करतात. त्यांनी पुढे मान्य केले की, सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे नव्हता. त्यांनी इतर सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

१५. सि.ए.कॅरिअर साक्षीदार क्रं.५ यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, सन २०१७ मध्ये ते पोलीस स्टेशन चामोर्शी येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत होते. दि. १६.०४.२०१७ रोजी त्यांना नागपुर येथे रासायनिक विश्लेषणासाठी नमुने घेवुन जाण्यासाठी डयुटी लावण्यात आली होती. ते दि.१७.०४.२०१७ रोजी रासायनिक विश्लेषणासाठी नमुने घेवुन नागपुर येथे गेले. त्यात गुन्हा क्रमांक ६५/२०१७ यातील देखील नमुना होता. त्यांनी ते नमुने न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर येथे जमा केले. त्यांनी त्याची पोच पावती घेतली. त्यांना दाखविण्यात आलेला नि.क्रं.२५ वरील पोच पावतीची सत्यप्रत तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यांना पत्र दिले होते. त्यांना दाखविण्यात आलेला नि.क्रं.२२ वरील पत्र तेच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले.

१६. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, कोणत्याही सरकारी कामासाठी जायचे असल्यास डयुटी पास दिली जाते व परत आल्यानंतर त्याबाबत पोलीस स्टेशनला कळवावे लागते. त्यांनी पुढे मान्य केले की, मुददेमाल सि.ए. कार्यालयात जमा केल्यानंतर पोच पावती दिली जाते. त्यांनी मान्य केले की, त्यांनी गुन्हा क्रमांक ६५/२०१७ या गुन्हयातील मुददेमालाची स्वतंत्र पोच पावती घेतली नाही. त्यानंतर त्यांनी इतर सुचक प्रश्नांना नाकारले आहे.

१७. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सरकारी वकिलांनी युक्तीवाद केला की, साक्षीदारांचा पुरावा विश्वसनिय आहे. जप्ती पंचनामा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत झाला आहे व त्याबाबतचा रासायनिक विश्लेषण अहवाल अभियोग पक्षाच्या पुराव्याला बळकटी देणारा आहे. आरोपीविरूध्दचा गुन्हा शाबीत होत असल्याने आरोपीला शिक्षा करण्याची विनंती केली. अभियोग पक्षातर्फे त्यांचे युक्तीवादात माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी मोहम्मद अलीजान वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र १९७५ (१) एल. जे. सॉफट १५२ यात दिलेल्या न्यायनिवाडयाचा आधार घेण्यात आला.

१८. बचाव पक्षातर्फे वकिलांनी नमुद केले की, आरोपीचे घटनास्थळावरील उपस्थिती शाबीत झालेली नाही. साक्षीदार क्रं.१ हा पोलिसांचा नेहमीचा पंच आहे. त्यामुळे साक्षीदार क्रं.१ चा पुरावा विश्वसनीय नाही. तसेच पोलिस साक्षदारांचा पुरावा विश्वसनीय नाही. कथित घटनास्थळावर मिळालेला मुददेमाल आरोपीने ठेवला होता हे दाखविण्यासाठी ठोस पुरावा नाही. त्यामुळे आरोपीचा गुन्हयातील सहभाग शाबीत होत नाही. अभियोग पक्षातर्फे दाखल न्यायनिवाडा या प्रकरणास लागु होत नाही. अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीचा गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. म्हणुन आरोपीला निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

१९. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. साक्षीदार क्रं.१ हा पोलिसांचा नेहमीचा पंच साक्षदार दिसतो. त्यामुळे त्याचा पुरावा विश्वसनीय दिसत नाही. कथित घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असुन कथित मुददेमाल आरोपीने ठेवल्याचा ठोस पुरावा अभिलेखावर नाही. आरोपीची घ टनास्थळ उपस्थिती देखील संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. कथित घ टनास्थळावर दारु विकत घेवुन पिणारे व्यक्ती उपस्थित होते असे पुराव्यावरुन दिसत

नाही. त्यामुळे आरोपी हा कथित मुददेमाल बाळगुन विक्री करताना मिळुन आला असे संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन आरोपीवरील लावण्यात आलेला दोषारोप संशयाच्यापलीकडे जावुन शाबीत होत नाही म्हणुन आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल परिणामी मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा कं. २ च्या निर्ष्कषाच्या अनुषगांने खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ आरोपी रमेश रामलु कोटगीलवार याला फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) या गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ जप्त मुददेमाल देशी दारू संत्रा कंपनीच्या ९० मि.ली. मापाच्या एकुण २० सिलबंद बाटल्या राज्य उत्पादन शुल्क विभाग, गडचिरोली यांच्याकडे विल्हेवाटीकरीता पाठविण्यात आले.

३. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द होईल.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.05.05 16:28:57 +0530

चामोर्शी.
दिनांक : ०५/०५/२०२६

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.